अवधुत गुरुनाथ नार्वेकर वि.
ज्योती विजय मुद्राळे वगैरे २

## निशाणी क्रमांक ३९ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांच्या मते, प्रस्तुतचा दावा हा जिल्हा न्यायालयात विना कैफियत चालून पुन्हा सावंतवाडी येथील न्यायालयात रिमांड केलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत कोरोना महामारीची साथ असल्याने सर्वत्र न्यायालयीन कामकाज बंद असलेने त्यांना मुदतीत त्यांची कैफियत दाखल न केल्याने त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश पारीत झालेला आहे. त्यांना कैफियत देण्याची संधी न मिळाल्यास त्यांच्या नैसर्गिक न्यायहक्कांवर गदा येणारी आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे 'कैफियत नाही' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जात नमुद कारण हे संयुक्तीक नाही. अर्ज मंजूर करावयाचा असलने रक्कम रु.१०००/- खर्च आकारणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द थकीत भाडे व नुकसान भरपाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर

लागण्याकरीता प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादीचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रतिवादी क्र.१ यांचा नि.३९ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- ०४/१२/२०२३ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. filed judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Sawantwadi. |
| Judgment/order signed by the P.O.on | : | 04-12-2023 |
| Judgment/order uploaded on | : | 07-12-2023 |